सूचना का अधिकार

महाराष्ट्र शासन
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, मिरज जि.सांगली
Government Medical College & Hospital, Miraj Dist-Sangli
Tel:0233/2232090-99 Fax:2231959 E-mail:-deangmcmiraj@yahoo.co.in

जाक्र.शावैमरुमि/भांडार/मज्योफुजआयो/मुलाखत/५७८८-९२/२०२२ दिनांकः-२२.०२.२०२२

# जाहिरात (थेट मुलाखत)

**विषयः-निवड समितीमार्फत डायलेसिस तंत्रज्ञ व डाटा एन्ट्री ऑपरेटर ही पदे करार तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात भरणेसाठी मुलाखतीस उपस्थित राहणेबाबत]**

संदर्भ-१) संचालनालयाचे पत्र क्र.संवैशिवसं/रागांजीआयोसोसायटी/४अ दिनांक-०१.०६.२०१२
२) क्र.रागांजीआयोसोसायटी यांचे पत्र क्र. रांगाजीआयसोसायटी/आरंभपूर्व तयारी/७७७/२०१२ दिनांक-३१.०७.२०१२
३) मा.आयुक्त,संचालनालय,वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई यांचे आदेश क्र. DMER-1202/2/2022-EDU, Date: 5-7-2022
४) मा.आयुक्त, वै.शि.व सं. मुंबई यांचे पत्र क्र. No.DMER/12022/2/2022- EDU, दिनांक- ०६-०७-२०२२
५) मा.आयुक्त,वै.शि.व संशोधन,संचालनालय,मुंबई यांचे दिनांक २१.०८.२०२२ रोजीच्या व्हीडीओ कॉन्फरन्स बैठकीतील निर्देश.
६) मुख्य समन्वयक,मज्योफुजआयो शावैमरु मिरज व पवपाशारु सांगली यांचे दिनांक- ०१.०९.२०२२ रोजीचे पत्र.
७) दिनांक ०३.०९.२०२२ रोजीची महाविद्यालयीन परिषद इतिवृत्त.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,मिरज व पद्मभूषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालय,सांगली येथील रुग्णालयात महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत दाखल रुग्णांना रुग्णसेवा देण्यासाठी व त्याचे डाटा ऑपरेटींगचे कामकाज सुरळित पार पाडण्यासाठी करार तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात शैक्षणिक पात्रता,गुणवत्ता व अनुभवानुसार थेट मुलाखतीव्दारे तातडीने पदे भरावयाची आहेत.

तरी ईच्छुक उमेदवारांची आवश्यक त्या सर्व शैक्षणिक मुळ प्रमाणपत्रासह व त्यांच्या छायांकित व साक्षांकित प्रतीच्या एकसेटसह **दिनांक २७.०९.२०२२ रोजी दुपारी २.०० वाजता** महाविद्यालयीन परिषद हॉल,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मिरज येथे उपस्थित राहावे.

| अ.क्र | पदाचे नांव | पद संख्या | शैक्षणिक अर्हता | अनुभव | प्रतिमाह एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|---|
| १ | डाटा एंट्री ऑपरेटर कम बिलिंग क्लर्क | ०४ | १) कोणत्याही शाखेचा पदवीधर उमेदवार<br>२) MSCIT, मराठी टायपिंग ३० प्र.शब्द व इंग्रजी टायपिंग ४० प्र.शब्द व संगणक हाताळणीचे संपूर्ण ज्ञान<br>३)महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत रुग्णालयात डाटा एंन्ट्री ऑपरेटर कम बिलिंग क्लर्क किंवा आरोग्य मित्र म्हणून काम केलेल्या व सदरहु योजनेची संपूर्ण माहिति असणाऱ्या उमेदवारास प्रथम प्राधान्य देण्यात येईल. | रुग्णालयात काम केलेल्या डाटा एंन्ट्री ऑपरेटर/सदर योजनेतील आरोग्य मित्र म्हणून म.ज्यो.फु.ज.आ. योजने अंतर्गत काम केलेल्याचा १ वर्षाचा अनुभव | रु.१०,०००/- **प्रतिमाह** |
| २ | डायलेसिस तंत्रज्ञ | ०१ | डायलेसिस टेक्नॉलॉजीच्या डिग्री किंवा डिप्लोमा असणे आवश्यक आहे. अनुभवास प्राध्यान्य देण्यात येईल. | डायलेसिस युनिट मधील १ वर्षाचा अनुभव | १५,०००/- **प्रतिमाह** |
| | **एकूण पदे** | ०५ | | | |

पा.३ ९१२

अधिष्ठाता,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,मिरज या संस्थेच्या संस्थेच्या www.gmcmiraj.edu.co.in या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन तसेच या रुग्णालयातील बाहयरुग्ण विभाग अधिष्ठात कार्यालय येथील जाहिर नोटीस बोर्डावर जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर जाहिरातीच्या अनुषंगाने थेट मुलाखीती वरील पदाच्या ठेवण्यात आलेल्या आहेत. सदर मुलाखतीसाठी उपस्थित राहतांना आवश्यक कागदपत्र मुळ प्रती व छायांकित एक प्रत घेऊन मुलाखतीस उपस्थित रहावे.

**मुलाखतीचा दिनांकः- २७.०९.२०२२ रोजी दुपारी २.०० वाजता**

**मुलाखतीचे ठिकाणः- महाविद्यालयीन परिषद हॉल,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मिरज**

**अटी व शर्तीः-**

१) जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या शैक्षणीक अर्हता व अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारास मुलाखतीस उपस्थित राहता येईल.

२) जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव यासंबधी सत्यप्रती असल्याखेरीज मुलाखत घेण्यात येणार नाही.

३) उपरोक्त पद हे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात व करार तत्वावरचे आहे.

४) सदर भरती प्रक्रिया बाबत सर्व स्तरावरील अधिकार निवड समितीकडे राखून ठेवण्यात आलेले आहे.

५) नियुक्तीसाठी वाहय शक्तीचा दवाव अथवा शिफारस आणणारे उमेदवार अपात्र ठरतील.

६) सदरचे पद तात्पुरत्या स्वरुपात करार तत्वारील असल्याने कायमस्वरुपी कामावर सामावून घेणे बाबत मे.न्यायालयात दावा दाखल करता येणार नाही.

७) जाहीरातीमध्ये नमुद केलेल्या शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करणाऱ्या उमदेवारास अर्ज करता येईल.तसेच उच्च शैक्षणिक अर्हता असणाऱ्या उमेदवारांना प्राध्यान्य देण्यात येईल.

८) सदर पदाच्या नियुक्ती आदेश संदर्भीत घेऊन मे.न्यायालयात कायमस्वरुपी कामावर सामावून घेणे बाबत याचिका दाखल करणार नसल्यावावत निवड झालेल्या उमेदवाराकडून प्रतिज्ञापत्र (१०० रु.बॉन्ड पेपरवर) लिहून घेण्यात येईल.

९) तात्पुरती नियुक्ती आदेश दिल्यानंतर काम सोडावयाचे असल्यास एक महिना अगोदर पुर्व अर्ज करणे बंधनकारक राहील.

**अधिष्ठाता,**
**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,मिरज**

**प्रति-** नोटीस बोर्ड,अधिष्ठाता कार्यालय/बाहय रुग्णविभाग/वैद्यकीय अधिक्षक कार्यालय नोटीस बोर्ड शा.वै.म.व रु.मिरज व प.व.पा.शा.रु. सांगली/सर्व संबंधित समिती सदस्य

प्रत- Spark Technologies Ltd. Krishna Smruti, Flat No. 6 Govt. Colony,Near Purva Garden Hotel Vishrambagh Sangli २/ आपणास कळविण्यात येते की,या संस्थेची वेबसाईटचे कामकाज करणेचे देखभाल आपण करीत असून वरील मुलाखतीची जाहीरात संस्थेच्या www.gmcmiraj.edu.co.in या संकेतस्थळावर अपलोड करण्यात यावी. व त्यावाबतचा अहवाल या संस्थेस सादर करावा.

पा.ऽ.२/२